


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३५१, मंगळवार २२ ऑक्टोबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पारनेर में बच्चा-बच्चा नीलेश लंके का नाम लेता है !

## अजितदादा पवारांच्या टीकेला खा. नीलेश लंके यांचे प्रत्युत्तर

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

**माझ्या मतदारसंघात गेल्यानंतर जो जनमानसाचा आवाज आहे, तो अजितदादांच्या कानावर गेल्याने साहजिकच ते माझे नाव घेणारच ना ! त्यात काय वेगळे आहे ? कारण त्या ठिकाणी बच्चा, बच्चा हमारा नाम लेता है, येणारे नेतेही चुक भुलीने का होईना माझे नाव घेणार ना ? असे सांगत खा. नीलेश लंके यांनी शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजितदादा पवार यांनी त्यांच्यावर केलेल्या टिकेस प्रत्युत्तर दिले.**



विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या मेळाव्याचे शनिवारी पारनेर येथील बाजार तळावर आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात अजित पवार हे राज्य सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहीती देत असताना शेतीच्या सिंचनासाठी घेण्यात आलेल्या निर्णयावर ते बोलताना भुमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली वसंत शिंदे, संजय भोर, संतोष वाबळे, प्रवीण खोडदे, वसंत साठे, बाळासाहेब वाळुंज, विशाल करंजुले यांनी पाणी आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं अशी घोषणाबाजी करीत कुकडी प्रकल्पातील पारनेर तालुक्याच्या हक्काच्या पाण्याकडे पवार यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांनी कान्हूरपठार येथे पार पडलेल्या पूर्वीच्या एका सभेत तालुक्याचे हक्काचे एक टीएमसी पाणी देण्याची घोषणा केली होती. मात्र पवारांची ही घोषणा हवेतच विरली होती.

या घोषणाबाजीवर भाष्य करताना पवार यांनी पाणी तुझ्याच बापाचं आहे, आम्ही कुठे नाही म्हणतोय असे उत्तर देतानाच तुला लंकेने पाठविले का ? असा सवाल पवार यांनी केला होता. त्यावर दादा आम्ही तुमचेच आहोत, पाण्याचे तेव्हडं पाहा. असे आंदोलकांकडून सांगण्यात आल्यावर माझे कार्यकर्ते असे नसतात असे सांगत अजित पवार यांनी हा विषय तिथेच थांबविला होता. त्यावर मुंबईत असलेल्या खा. नीलेश लंके यांना पत्रकारांनी गाठून अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता लंके यांनी पारनेरमे बच्चा-बच्चा नीलेश लंके का नाम लेता है ! अशी प्रतिक्रीया देत पवार यांच्या वक्तव्यावर प्रत्युत्तर दिले.

### त्याचे उत्तर २३ नोव्हेंबरला मतदारसंघ देईल !

**खासदारकी आणि आमदारकी एकाच घरात देणार का असा सवाल अजित पवार यांनी केला आहे, या प्रश्नावर उत्तर देताना खा. लंके म्हणाले, सगळ्या राज्याला माहीती आहे, कोणाच्या घरात किती पदे आहेत. त्याला उत्तर २३ नोव्हेंबर रोजी माझा मतदारसंघ देईल. त्या गोष्टीवर भाष्य न करणे बरे राहिल असे लंके म्हणाले.**

### मविआच्या जास्त जागा निवडूण आणणे महत्वाचे

**तुमच्या भागातील सुजित झावरे, माधवराव लामखडे आदी अनेक इच्छुक राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या कार्यालयात पहावयास मिळाल्यासंदर्भातील प्रश्नावर बोलताना महायुतीशी आमचा काही संबंध नाही. आम्ही महाविकास आघाडीत काम करणारे सर्व कार्यकर्ते आहोत. महाविकास आघाडीच्या जास्तीत जास्त जागा कशा निवडूण येतील हे आमच्यासाठी महत्वाचे असेल असे लंके यांनी सांगितले.**

### पारनेरचा उमेदवार १ लाखांच्या मताधिक्क्याने विजयी होईल

**राणी लंके यांचा विजय किमान किती मतांनी होईल ? या प्रश्नावर उत्तर देताना माझ्या मतदारसंघातील, नगर जिल्हयातील कोणतीही उमेदवारी अद्याप जाहिर नाही. त्यामुळे कोण उमेदवार असेल, कोण नसेल हे मला माहीती नाही. परंतू पारनेर-नगर मतदार संघातील महाविकास आघाडीचा उमेदवार किमान एक लाख मतांच्या मताधिक्क्याने विजयी होईल असा विश्वास खा. नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

# गोरक्षक व पोलिसांच्या सतर्कतेमुळे ५२ गोवंशांची सुटका

## अरेरावी करणाऱ्या गोतस्करांना संतप्त जमावाकडून बेदम चोप

**पारनेर : प्रतिनिधी**

**गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे गोतस्करांच्या ताब्यातील तब्बल ५२ वासरांची सुटका करण्यात आली आहे.रविवारी (२० ऑक्टोबर) अहिल्यानगर - पुणे महामार्गावर ,सुपे टोलनाक्यावर रात्री हा प्रकार घडला.यावेळी गोतस्करांनी अरेरावी करीत वासरांनी भरलेले वाहन पळून नेण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी झालेल्या गोंधळामुळे मोठा जमाव तेथे जमला.गोतस्करांच्या अरेरावीमुळे संतप्त झालेल्या जमावाने त्यांना बेदम चोप दिला.सुपे व पारनेर पोलिसांनी जमावाला शांत करून गोतस्करांची जमावाच्या तावडीतून सुटका केली.**




याप्रकरणी सुपे पोलीस ठाण्यात मुस्तकीम जानमीया कुरेशी ( वय३८ ) व्यापारी मोहल्ला, जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयामागे व आयान जाकिर कुरेशी (वय१९ ) सुभेदार गल्ली, झेंडीगेट यांच्यावर महाराष्ट्र पशू प्राणी संरक्षण कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.मारहाणीत जखमी झालेल्या गोतस्करांना अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

यासंदर्भात माहिती अशी की, रविवारी दुपारी आरोपींनी तालुक्यातील जवळे,राळेगण थेरपाळ येथून वासरे खरेदी केली.खरेदी केलेल्या वासरांना मालमोटारीतून(क्रमांक एमएच१६ सीडी ६०३५) नगरकडे नेले जात असताना राळेगणसिध्दी येथील काही नागरिकांनी मालमोटार अडवण्याचा प्रयत्न केला.मात्र चालकाने मालमोटार न थांबवता जातेगावच्या दिशेने पलायन केले.याची माहिती सुपे येथील गोरक्षकांना देण्यात आली.त्यांनी सुपे टोलनाक्यावर वासरे घेऊन जाणारी मालमोटार अडवली.मालमोटारीतील वासरे सोडून देण्याची मागणी गोरक्षकांनी गोतस्करांना केली.मात्र त्यांनी अरेरावी सुरू केली.दरम्यान तेथे मोठा जमाव जमला.संतप्त झालेल्या जमावाने अरेरावी करणाऱ्या गोतस्करांना बेदम चोप दिला.

या प्रकाराची माहिती मिळताच सुपे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड व पारनेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर पोलीस पथकासह घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी जमावाला शांत करीत गोतस्करांची सुटका करून त्यांना ताब्यात घेतले.तसेच मालमोटारीतील ५२ वासरांची सुटका केली.

### आरोपींचीही गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दरम्यान अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या आरोपी जानमिया कुरेशी व आयान कुरेशी यांनी आपल्याला जमावाने बेदम मारहाण केली आहे. तसेच आपल्याकडील १ लाख २० हजार रुपये लांबवल्याचा आरोप करीत संबधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.**

# खबरदार ! माझ्या बापाविषयी बोलाल तर !

## ■ बाळासाहेब थोरातांची लेक कडाडली
## ■ जयश्री थोरातांचा सुजय विखेंना इशारा



**संगमनेर:प्रतिनिधी**

**खबरदार माझ्या बापाविषयी बोलाल तर, असा इशारा बाळासाहेब थोरात यांच्या कन्या जयश्री थोरात यांनी भाजप नेते सुजय विखे यांना दिला आहे. दोन दिवसांपूर्वी सुजय विखे यांनी संगमनेर मतदारसंघातील तळेगाव येथे सभा घेत बाळासाहेब थोरात यांच्यावर टिका केली होती.**

थोरातांनी ४० वर्ष सेटलमेंटचे राजकारण केले असून आम्ही चाळीस वर्षांची दहशत मोडून काढणार आहोत, असं ते म्हणाले होते. संगमनेरमध्ये माझ्या कार्यकर्त्यांवर दहशत करण्याचा प्रयत्न केला तर इथे येऊन गाडीन, असेही ते म्हणाले होते. यावर आता जयश्री थोरात यांनी जाहीर सभेतून सुजय विखेंवर पलटवार करत त्यांना इशारा दिला आहे. बाळासाहेब थोरात संगमनेर तालुक्याचा स्वाभिमान असून या तालुक्याकडे वाकड्या नजरेने बघायचे नाही. संगमनेर तालुका तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असे जयश्री थोरात म्हणाल्या.

ते म्हणतात यांनी सगळी पदं घरातच ठेवली. बरोबर आहे, बाळासाहेब थोरात यांचा परिवार म्हणजे संगमनेर तालुका आहे. या संगमनेर तालुक्याकडे वाकड्या नजरेने बघायचं नाही. हा तालुका तुम्हाला तुमची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जयश्री थोरात यांनी दिला.

जेव्हापासून हे खोके सरकार बनलं, तेव्हापासून त्रास चालू केला. बाळासाहेब थोरात यांनी त्यांचं ( विखेंच) काय वाईट केलं होतं?, बाळासाहेब थोरात सर्वात जास्त काळ महसूलमंत्री राहिले, पण कधी कुणाचं वाटोळं केलं नाही, कुणाला त्रास दिला नाही. तुम्ही ज्यांच्यावर टिका करता ते बाळासाहेब थोरात या संगमनेर तालुक्याचा स्वाभिमान आहेत. खबरदार, माझ्या बापाविषयी असे काही बोलले तर, ज्यांना स्वतःच घर सांभाळता येत नाही, ते आपलं घर काय सांभाळणार.

आपल्या तालुक्यातील काही टवाळके त्यांच्यासोबत फिरताय. तुम्ही कुणाला घरात घेताय ते एकदा बघा. बाळासाहेब थोरात यांना पूर्ण देशात मान आहे. काँग्रेस वर्किंग कमिटीत मनमोहन सिंग, सोनिया गांधी, मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासोबत बाळासाहेब थोरात यांचे नाव आहे.
ही निवडणूक एकतर्फी करायची आहे. विरोधकांचे डीपॉजिट जप्त झाले पाहिजे. जे आपलं वाटोळं करायचं बघताय, त्यांना संगमनेर तालुक्यात एन्ट्री द्यायची नाही. बाळासाहेब थोरात यांची १९८५ ची निवडणूक युवकांनी हाती घेतली होती. आज देखील जे युवक माझ्यासोबत आहेत ते माझे भाऊ आहेत. उर्वरीत पान ३ वर

# पारनेरच्या जागेसाठी शिवसेनेचा शिंदे गट अजूनही आशावादी!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमवेत मंगळवारी पुन्हा बैठक

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर-नगर मतदार संघाची महायुतीची जागा शिवसेना एकनाथ शिंदे गटाला मिळावी यासाठी जिल्ह्यातील शिंदे शिवसेनेचे पदाधिकारी अद्यापही प्रयत्नशिल असून ही जागा शिवसेनेला मिळेल अशी आशा या पदाधिकाऱ्यांना आहे. दरम्यान, जागेच्या मागणीसंदर्भात मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पदाधिकाऱ्यांना मुंबईत बोलविल्याची माहीती विश्वासनिय सुत्रांनी दिली.**




मिळालेल्या माहीतीनुसार उत्तर नगर मतदारसंघात श्रीरामपुर व नेवासे या दोन मतदारसंघाच्या जागा शिंदे यांच्या शिवसेनेला मिळाल्या असून नगर दक्षिणेतील पारनेर-नगर मतदारसंघाची जागा शिवसेनेला मिळावी यासाठी जिल्हयातील पदाधिकारी प्रयत्नशिल आहेत.

जिल्हयातील पदाधिकारी पारनेरसाठी आग्रही असताना उर्वरीत पान ३ वर






निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

## मासिक पाळी नीट राहावी म्हणून

# काय खाऊ नये?

**मासिक पाळी हा कोणत्याही महिलेसाठी जिव्हाळ्याचा विषय. प्रत्येक महिलेला निदान ३०-३५ वर्षे दर महिन्याला पाळी येते आणि त्यासोबत येणारे त्रासही सहन करावे लागतात. पाळी फक्त गर्भधारणेशी संबंधित नसून मासिक पाळीचं चक्र नियमित राहिलं तर महिलांचं इतर आरोग्यही चांगलं राहतं. मासिक पाळी सुरळीत राहाण्याचा आणि तुम्ही काय आहार घेताय याचाही फार जवळचा संबंध असतो.**

समतोल आहारामुळे पाळीचं चक्र नियमित राहातं. पाळीमध्ये अगोदरपासूनच गुंतागुंत असेल तर आहारात योग्य बदल केल्यानं फायदा होऊ शकतो. जंक फूडमुळे मासिक पाळी नियंत्रित करणाऱ्या हार्मोन्सवर परिणाम होतो आणि त्यामुळे पाळी उशीरा येणं किंवा वेळेपेक्षा जास्त लांबणं असे प्रकार घडू शकतात. अन्नात हिमोग्लोबिनची कमतरता असेल पाळीच्या वेळी कमी रक्तस्राव होऊन त्रास होऊ शकतो. पाळी संदर्भात आहाराचं खूपच महत्त्व आहे, पण अनेक महिलांना हे माहितीच नसतं की आपण जे खातोय त्याने आपल्या पाळीवर परिणाम होतोय. सतत शिळं अन्न खाणं किंवा चौरस आहार न घेणं यामुळे तुमची पाळी अनियमित होते, उशीरा येते. मासिक पाळी नियमित असावी यासाठी आहारातलं फॅट्सचं प्रमाण कमी करायला हवं. तुमच्या जेवणात खूप तेलकट पदार्थांचा समावेश असेल तर त्याने हार्मोनल बदल होऊन पाळीवर परिणाम होतो. जंक फुड खाल्ल्याने पाळी अनियमित होऊ शकते. गोड पदार्थांचं अतिसेवन करणंही टाळावं. अनेकदा असं लक्षात आलं आहे की, मासिक पाळी सुरू असताना जर तुम्ही गोड जेवण केलंत तर तुम्हाला होणारा त्रास वाढतो. तुमच्या आहारातल्या कॅलरीचं प्रमाण खूप वाढलं तर शरीरात हार्मोन्सचं संतुलन बिघडतं. कधी कधी शरीरात पुरुषी हार्मोन्सचं प्रमाणही वाढतं. त्यामुळे स्कीन खराब होणं, मासिक पाळी अनियमित होणं असे साईड इफेक्ट होतात. खूप मसालेदार, खूप गरम जेवण करू नये. यामुळे मासिक पाळीच्या काळात अतिरक्तस्राव होऊ शकतो किंवा पाळीचा कालावधी लांबू शकतो. पाळी दरम्यान होणारा त्रास कमी करायचा असेल, पाळी नियमित यावी असं वाटत असेल तर आहाराची काही महत्त्वाची सूत्रं पाळली पाहिजेत. दिवसात तीन आहार घेतलेच पाहिजेत. सकाळचा नाश्ता, दुपारचं जेवण आणि रात्रीचं जेवण नियमितपणे, ठरलेल्या वेळेला करा. पण दोन जेवणांच्यामध्ये शक्यतो काहीही खाणं टाळा. रात्रीचं जेवणं शक्यतो झोपण्याच्या तीन तास आधी घ्या. रात्री जेवल्याजेवल्या लगेच झोपू नका. रात्रीचं जेवण आणि सकाळचा नाश्ता यात कमीत कमी १२ तासांचं अंतर ठेवा. या गोष्टी पाळल्या तर आपल्या पचनसंस्थेचं कार्य सुधारतं आणि आपण जे अन्न घेतोय त्याचं चरबीत रुपांतर होत नाही.

### काय खावं?

अनेक स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिनचं प्रमाण कमी असतं. त्यामुळे त्यांना पाळीच्या काळात रक्तस्राव कमी होतो किंवा पाळीच अनेकदा येत नाही. अशा परिस्थितीत कोथिंबीर, पालक, बीट यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करावा. त्याच बरोबर जेवताना डाळी, शेंगदाणे, सोयबीन, वाटाणे अशा प्रथिनयुक्त पदार्थांचा समावेश असायला हवा. पनीर, मासे, चिकन असा प्रोटीनचा साठा असणारे पदार्थही आहारात अधून मधून असायला हवेत. रोजच्या जेवणात कोशिंबीरी असाव्यात.



### पाळी येण्याच्या आधी आहार कसा असावा?

पाळी आधी, पाळी दरम्यान आणि पाळीनंतर आहारात थोडे बदल करावेत. यूकेच्या नॅशनल हेल्थ सिस्टिमने याबद्दल काही मार्गदर्शक तत्वंही जारी केली आहेत. पाळीच्या आधी तुमच्या शरीरात काही बदल होत असतात, प्रीमेन्स्ट्रुअल सिंड्रोममधून शरीर जात असतं. याकाळात शारीरिक तसंच मानसिक त्रास होण्याची शक्यता असते. अनेक महिलांना मुड स्विंग्स, थकवा, चिडचिड अशी लक्षणं जाणवतात. याकाळात भूकही जास्त लागते. विशेषतः गोड किंवा चटपटीत, मीठाचं प्रमाण जास्त असलेले पदार्थ खाण्याची इच्छा होते. याच कारणं म्हणजे पाळी यायच्या काही दिवस आधी तुमच्या रेस्टिंग मेटॅबोलिझम रेटमध्ये तात्पुरती वाढ झालेली असते. त्यामुळे काही रिसर्च असं सुचवतात की या काळात दिवसाला १०० ते ३०० कॅलरी जास्त घेतल्या तरी चालू शकतं. भुकेच्या बाबतीत तुमच्या शरीराचं ऐकणं ही एक चांगली गोष्ट आहे. त्यामुळे आपल्या शरीराला उर्जा मिळते आणि आपलं शरीर नीट काम करू शकतं. या काळात फायबरयुक्त कार्बोहायड्रेड्स (जसं की बाजरी, गव्हाचा जाडसर आटा, ज्वारी, नागली अशी धान्यं) किंवा प्रोटीनयुक्त आहार घ्यायला हवा. गोड पदार्थ किंवा जंक फुड खाण्याची या काळात इच्छा होते पण त्याचा शरीराच्या गरजेशी संबंध नसतो तर ते आपल्या मुडवर अवलंबून असतं. या काळात आपल्याला असं अन्न खाण्याची इच्छा होते ज्याने आपल्याला आनंद होईल. पण त्यामुळे उलट थकवा, वेदना, झोप न येणं अशी लक्षणं जाणवतात. काही संशोधनांमधून असंही लक्षात आलंय की फळं खाल्ल्याने महिलांना पाळीआधी आणि पाळीदरम्यान होणारा त्रास कमी होऊ शकतो. चॉकलेटपैकी फक्त डार्क चॉकलेट (ज्यात ७० टक्के कोको असतो), ज्यात साखर कमी असते, खाता येऊ शकतं. इतर चॉकलेट्सने त्रास होण्याची शक्यता असते. या काळात कॉफीचं प्रमाणही कमी केलं पाहिजे. पाळीत डार्क चॉकलेट खाल्लं तरच फायदा होऊ शकतो, इतर प्रकारच्या चॉकलेट्सने नुकसानच होतं. मासिक पाळीच्या काळात पाणीही जास्त प्यायला हवं. या काळात जास्त पाणी प्यायलत तर अतिरक्तस्राव होत नाही. तसंच पाळीच्या काळात ज्या कळा येतात त्याही कमी होऊ शकतात. या काळात कोणत्याही प्रकारचं अल्कोहोल घेता कामा नये.

# टॅम्पून्स, मेनस्ट्रुअल कप म्हणजे काय?

**वयाच्या साधारण बाराव्या-तेराव्या वर्षांपासून पन्नाशीपर्यंत स्त्री प्रजननक्षम असते, याचाच अर्थ या काळात ती प्रत्येक महिन्यात मासिक पाळीच्या चक्रातून जात असते. हल्ली ही प्रक्रिया अगदी दहाव्या वर्षांपासूनसुद्धा सुरू होत असल्याचे दिसू येते. महिन्याच्या या चार ते पाच दिवसांत होणाऱ्या रक्तस्रावाच्या काळात स्वच्छतेची योग्य काळजी न घेतल्यास जंतुसंसर्ग होणे, चट्टे येणे आदी आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असते. रक्तस्राव शोषण्यासाठी सॅनिटरी नॅपकिन, टॅम्पून हे एकदा वापरण्यासारखे, तर कापड/कापडी पॅड आणि कप हे पुनर्वापर करता येण्यासारखे पर्याय आहेत. अविवाहित मुली सहसा नॅपकिनचा (पॅड) पर्याय निवडतात. विवाहित महिलांनी टॅम्पून, कप आदी पर्याय वापरावेत, असे सुचविले जाते...**

### कापड/कापडाची घडी

आर्थिकदृष्ट्या न परवडणे, उपलब्धता नसणे किंवा पॅड्स विकत घ्यायला संकोच वाटणे आदी कारणांमुळे काही ठिकाणी अजूनही मुली आणि स्त्रिया पाळीच्या दिवसांत जुने कपडे वापरतात. हे कपडे धुऊन परत वापरले जातात. धुतल्यानंतर बऱ्याचदा हे कापड उन्हात न वाळवणे, योग्य न धुणे तसेच पाळीच्या दिवसानंतर अडगळीत ठेवणे यामुळे अशा कपड्यांच्या वापराने योनीचा जंतुसंसर्ग होण्याची शक्यता असते. हे कपडे धुवावे लागत असल्याने याचा वापर करणे शक्यतो टाळले जाते. परंतु दर महिन्याला बाजारातील पॅड्स विकत घेऊन वापरणे शक्य नसल्यास कापडी घडीचाच पर्याय निवडला जातो.

### कापडी पॅड

कापडी घडीला पर्याय म्हणून आता पर्यावरणपूरक कापडी पॅड ही बाजारात उपलब्ध आहेत. अंतर्वस्त्राच्या आतून याचा वापर केला जात असून धुवून पुनर्वापर करता येतो. बाजारातील सॅनिटरी पॅडच्या तुलनेत मऊ आणि नैसर्गिक असल्याने याच्या वापराने त्वचेवर शक्यतो चट्टे येत नाही किंवा मांड्यांमध्ये घर्षण होऊन चालताना त्रास होत नाही. पुनर्वापर केला जात असल्याने सॅनिटरी नॅपकिनप्रमाणे प्लास्टिक कचरा निर्माण होत नाही, तसेच आर्थिकदृष्ट्यादेखील परवडते. मात्र धुवून वाळवताना स्वच्छतेची काळजी न घेतल्यास महिलांना अंतर्भागात संसर्ग होण्याची भीती असते.

### सॅनिटरी पॅड्स/नॅपकिन

महिलांमध्ये सर्वाधिक वापरला जाणाऱ्या हा प्रकार आहे. हे पॅड एकदाच वापरण्यासारखे असून कापूस, प्लास्टिक आणि शोषक जेल (अॅबझॉबन्ट जेल) यापासून बनवले जातात. यात रेग्युलर, लार्ज, ते अल्ट्रा थिन असे विविध प्रकार असतात. संसर्ग किंवा चट्टे येऊ नयेत यासाठी दर चार ते सहा तासांनी पॅड बदलणे अपेक्षित असते. रक्तस्राव अधिक असल्यास दोन ते तीन तासांनी बदलावेत. वापरणे, बदलणे यासाठी सोपा प्रकार असला तरीही दरमहा होणारा खर्च आणि मोठ्या प्रमाणात निर्माण होणारा प्लास्टिक कचरा हे याचे तोटे आहेत. वापरलेल्या पॅड्सची नीट विल्हेवाट न लावल्यास परिसरात आरोग्य समस्या उद्वण्याचा धोका असतो.

### टॅम्पून्स

टॅम्पून्स म्हणजे एक प्रकारे कापसाचा गोळा. योनीच्या आतल्या बाजूस घालून हे वापरात येतात. हे एकदाच वापरता येण्यासारखे असून रक्तस्रावानुसार दर दोन ते तीन तासांनी बदलणे आवश्यक आहे. आठ तासांहून अधिक काळ एक टॅम्पून वापरू नये. अधिक काळ योनीमार्गात राहिल्यास इथली जागा अतिकोरडी किंवा जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. यातून इतर तक्रारी उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे याचा वापर करीत असताना योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच बदलल्यानंतर हातांची स्वच्छता राखणे गरजेचे आहे. या प्रकाराचा प्रमुख फायदा म्हणजे हालचालींना अडथळा येत नाही व मुक्तपणे वावरता येते. नॅपकिन किंवा कापडी पॅडच्या तुलनेत टॅम्पून्स महाग असल्याने सर्वांनाच हा पर्याय परवडणारा नाही.

### मेनस्ट्रुअल कप

अधिक प्रचलित नसलेला पण आरोग्यदृष्ट्या फायदेशीर आणि पर्यावरणपूरक साधनप्रकार आहे. यात एकदाच आणि पुनर्वापर करता येणारे असे दोन्ही प्रकार आहेत. योनीच्या आत ठेवण्यात येणाऱ्या या कपमध्ये रक्तस्राव शोषला जात नाही तर साठवला जातो. काही कालावधीनंतर हा कप काढून त्यात साठलेला स्रावची शौचालयात विल्हेवाट लावली जाते. बारा तासांपर्यंत न बदलता या कपचा वापर करणे शक्य आहे. एक कप अनेक वर्षे वापरता येत असल्याने आर्थिकदृष्ट्या परवडते, तसेच विघटन न होणारा जैविक कचराही यातून निर्माण होत नाही. सुरुवातीला कप नीट बसवणे जिकिरीचे होऊ शकते. म्हणूनच मग बऱ्याचदा विवाहित महिलांनाच हा पर्याय वापरण्याचा सल्ला दिला जातो. पुनर्वापर होणारा कप असेल तर नियमित स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. कप काढताना नीट काळजी घेणे अत्यावश्यक आहे. योग्य खबरदारी घेऊन याचा वापर केल्यास हा सोयीस्कर पर्याय ठरू शकतो.

### मासिक पाळीत घ्यावयाची काळजी

- वारंवार कापड/ पॅड बदलणे : एकदा रक्त शरीरावाटे बाहेर पडले की ते जंतूंच्या वाढीसाठी अनुकूल माध्यम बनते. म्हणून स्राव कमी असला तरी जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून वारंवार साधने बदलणे आवश्यक असते. तसेच हे बदलल्यावर हात आणि योनीची जागा स्वच्छ करणे आणि वापरलेल्या साधनांची योग्य विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. पुनर्वापर करता येणाऱ्या साधनांची स्वच्छता कापड किंवा अन्य पुनर्वापराच्या साधनांचा वापर करीत असल्यास ही साधने स्वच्छ धुणे आवश्यक आहे. जंतुविरहित राहण्यासाठी जंतुनाशकाचा वापर न करता कडक उन्हात वाळवावीत.
- साधनांची विल्हेवाट : एकदाच वापरण्याचे साधन असेल तर ते वापरून झाल्यानंतर योग्य पद्धतीने त्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्यावरील रक्तस्रावामुळे ते जंतुसंसर्ग पसरण्याची शक्यता असते. सॅटनरी नॅपकिन वापरानंतर पेपरमध्ये गुंडाळून कचऱ्यात टाकावेत. कचरा नेणाऱ्या घंटा गाडीत कधी कधी नॅपकिनसाठी वेगळा कप्पा असतो. अशा वेळी पॅड्स त्यातच टाकावेत. पॅड्स ओल्या कचऱ्यात टाकू नयेत, शौचालयामध्ये फ्लश करू नयेत, उघड्यावर फेकू नयेत.
- चट्टे येणे : एकच पॅड अधिक काळ वापरल्यास ओले होऊन मांड्यांना घासले जाते आणि मांड्यांवर चट्टे येतात. हे टाळण्यासाठी पॅड वारंवार बदलावेत आणि ती जागा कोरडी राहील याची काळजी घ्यावी. चट्टे आल्यास त्या जागी जंतुप्रतिबंधक पावडर किंवा मलमचा वापर करावा.

# ४ दिवसांत आंघोळ करताना कोणती काळजी घ्यावी?

**मासिक पाळीचे ते चार दिवस हे प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातील अतिशय नाजूक दिवस असतात. या चार दिवसांत स्त्रीच्या शरीरात अतिशय वेगवेगळे बदल घडून येतात, याचबरोबर अनेक हार्मोनल चेंजेस होताना दिसतात. मासिक पाळीच्या दरम्यान त्या स्त्रीला शारीरिक आणि मानसिक विश्रांतीची खरी गरज असते. बहुतेक स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात पोटदुखी, डोकेदुखी, मळमळ होणे, मूड स्विंग, पायात पेटके येणे यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. या दिवसांत स्त्रियांनी स्वतःची विशेष काळजी घेणं गरजेचं असत. मासिक पाळीच्या काळात थोडासा निष्काळजीपणा किंवा आरोग्याची देखभाल न करणे यांसारख्या गोष्टी आपल्याला भविष्यात त्रास देऊ शकतात. या दिवसांत पर्सनल हायजिनसोबतच महिलांनी आपल्या तब्येतीची पुरेपूर काळजी घेतलीच पाहिजे.**

मासिक पाळी दरम्यान पर्सनल हायजिन व शरीराची स्वच्छता ठेवण्यासाठी दिवसांतून किमान दोनवेळा आंघोळ करणे हा उत्तम पर्याय आहे. या काळात आंघोळ केल्याने शारीरिक स्वच्छतेसोबतच आपल्याला फ्रेश राहण्यास मदत मिळते. मासिक पाळीदरम्यान पुरेशी स्वच्छता न ठेवल्यामुळे महिलांना युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनची (यूटीआय) समस्या होऊ शकते. म्हणूनच मासिक पाळीदरम्यान काही खास गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठीच मासिक पाळी दरम्यान आंघोळ करताना नेमक्या कोणकोणत्या गोष्टींची खबरदारी घेतली पाहिजे, ते पाहूयात...



### या गोष्टींची काळजी घ्यावी...

- मासिक पाळी दरम्यान आपण जे पॅड किंवा कप वापरत असाल ते काढून टाकण्याची खात्री करा : मासिक पाळी दरम्यान आंघोळ करताना आपण जर कप किंवा पॅड लावले असेल तर ते आंघोळीपूर्वी काढून टाकावे. काहीजणी आंघोळ करताना रक्तस्राव थांबावा म्हणून पॅड किंवा कप तसाच ठेवून मग आंघोळ करतात, परंतु हे चुकीचे आहे. आंघोळ करताना मासिक पाळीचा रक्तस्राव होत असेल तर तो नैसर्गिकरित्या होऊ द्यावा. आंघोळ करताना होणारा रक्तस्राव थांबवू नका. याचबरोबर प्रायव्हेट पार्टजवळ असणाऱ्या प्यूबिक हेअर्सची स्वच्छता राखा. आंघोळी दरम्यान जुने वापरलेले पॅड, टॅम्पॉन काढून टाकताय याची खात्री करून घ्यावी.
- योनी मार्गाची स्वच्छता करणे गरजेची : मासिक पाळीत आंघोळ करत असताना योनी मार्गाची स्वच्छता करणे अतिशय महत्वाचे असते. योनी मार्गाची स्वच्छता करण्यासाठी गरम किंवा थंड पाण्याचा वापर न करता साध्या नॉर्मल पाण्याचा वापर करावा. योनी मार्ग स्वच्छ करण्यासाठी साबण किंवा इतर केमिकल्सयुक्त प्रॉडक्ट्सचा वापर करणे टाळावे. कारण केमिकल्सयुक्त व सुगंधित प्रॉडक्ट्सचा वापर केल्याने इंन्फेक्शन होण्याची शक्यता आहे.
- योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका : साबण किंवा पाण्याचा वापर करून योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न करू नका. योनी मार्ग स्वतःची स्वच्छता स्वतः करत असते. त्यामुळे आपल्याला त्याची वेगळी स्वच्छता करण्याची गरज भासत नाही. जर आपण योनी मार्ग आतून स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला इंन्फेक्शन होऊ शकते. यामुळे योनी मार्गात जळजळ होणे, पुरळ येणे, खाज उठणे यांसारख्या समस्या होऊ शकतात. याचबरोबर योनी मार्ग आतून स्वच्छ केल्यास आतील त्वचेची पीएच पातळी ही कमी जास्त होऊन योनी मार्गासंबंधित अनेक प्रकारच्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे योनी मार्ग नेहमी बाहेरूनच स्वच्छ करावे तसेच कायम पुसून कोरडे ठेवावे.



- मासिक पाळीच्या काळात किमान दोन वेळा तरी आंघोळ कराच : मासिक पाळीच्या काळात किमान दोन वेळा तरी आंघोळ करून शारीरिक स्वच्छता ठेवणे गरजेचे आहे. आंघोळ करताना अतिशय गरम किंवा थंड पाण्याचा वापर करू नये. थंड पाण्याने अजिबात आंघोळ करू नये. यामुळे आपल्या शरीरातील रक्ताच्या चक्रावर त्याचा परिणाम होतो. यासाठीच पाळी दरम्यान आंघोळ करताना साध्या नॉर्मल पाण्याचा वापर करावा.
- बाथरूम स्वच्छ आहे ना? : मासिक पाळी दरम्यान आंघोळीला जाताना बाथरूम स्वच्छ आहे ना याची खात्री करून घ्या. बाथरूम स्वच्छ असणे हे आपल्या शारीरिक हायजिनच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. यामुळे मासिक पाळीदरम्यान आंघोळीला जाण्यापूर्वी आणि जाऊन आल्यानंतर बाथरुम स्वच्छ ठेवा.

### 'मासिक पाळी'च्या अज्ञानाचा परिणाम

- ६० ते ७० टक्के मुली या दिवसांमध्ये शाळेत जात नाहीत.
- २३ टक्के मुली पहिल्या पाळी नंतर शाळाच कायमची सोडून देतात.
- ४३ टक्के मुली मासिक पाळीचे स्वच्छता व्यवस्थापन योग्य प्रकारे करत नाही.
- ५४ टक्के मुलींना मासिक पाळी येण्याआधी तिच्या योग्य व्यवस्थापनेबद्दल काहीही माहिती नसते.
- ७७ टक्के मुलींना गर्भाशय हे पाळी दरम्यान येणाऱ्या रक्ताचे स्त्रोत असते व ५५ टक्के मुलींना मासिक पाळी ही नैसर्गिक बाब असल्याचे माहिती नसते.
- १० टक्के मुली याला भयानक रोग मानतात. त्यामुळे बरेच गैरसमज वाढतात.



## शॉर्ट न्यूज

### खंडणी न दिल्याने हॉटेलची तोडफोड

**नेवासा :** हॉटेल चालकाने खंडणी न दिल्याने हॉटेलची तोडफोड केल्याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पानेगाव येथे परमिट रूम अ‍ॅण्ड बिअर बार हे हॉटेल चालवायचे असेल तर ५ लाख रुपये खंडणी मागितली, खंडणी न दिल्याने अण्णासाहेब पवार व अनिकेत पवार यांनी हॉटेलमध्ये येऊन शिविगाळ करून ७५ हजार रुपये किमतीच्या हॉटेलच्या काउंटरच्या काचा व साहित्य फोडून गल्ल्यातील १२ हजार रुपये रोख रक्कम व विदेशी दारूच्या बाटल्या घेऊन गेले. याप्रकरणी हॉटेल मालक सुरज जंगले यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वूमन चॅम्पियन लीगचा श्रीगणेशा

**कोपरगाव :** तालुक्यातील कोकमठाण येथील आत्मा मालिक क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावर वुमन चॅम्पियन स्पर्धेचा जल्लोशात श्रीगणेशा करण्यात आला. स्पर्धेमध्ये मुंबई येथील दहिसर स्पोर्ट क्रिकेट क्लब, अहिल्यादेवीनगर इलेव्हन, रविशंकर क्रिकेट क्लब संगमनेरसह सातारा व परभणी येथील क्रिकेट संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धा वन डे खेळविल्या जात आहेत. या स्पर्धेमध्ये दहिसर क्रिकेट क्लबचा ८० वा दौरा आहे. या संघाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

### मिडसांगवी शिवारात तपासणी नाका सुरू

**पाथर्डी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण-निर्मल (विशाखापट्टणम) या राष्ट्रीय महामार्गावर बीड जिल्हा सरहद्दीवर पाथर्डी पोलिसांनी नाकाबंदी चालू केली असून, मिडसांगवी शिवारात तपासणी नाका सुरू केला आहे. उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर चितळवाडी शिवारातही असा नाका सुरू होणार आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दिली. जिल्हा व पाथर्डी तालुक्याच्या हद्दीतील असलेले मिडसांगवी गाव हे शेवटचे असून, यालाच लागून लगेच बीड जिल्ह्याची हद्द सुरू होते. याच ठिकाणी पोलिसांचे स्थिर पथक नेमण्यात आले आहे.

### कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्यात जनजागृती

**अकोले :** शिक्षण प्रसारक संस्थेच्या संगमनेर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, वसुंधरा ग्रीन क्लब आणि कळसूबाई-हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्य, शेंडी परिक्षेत्र यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण जनजागृती व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. वन्यजीव सप्ताहांतर्गत नाशिक वन्यजीव विभागांतर्गत असलेल्या कळसूबाई-हरिश्चंद्रगड वन्यजीव अभयारण्यातील परिक्षेत्रात, संगमनेर महाविद्यालय व वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी जनजागृती अभियानाचे आयोजन केले जाते.

### श्रीगोंद्याच्या धान्य लिलावात वाद

**श्रीगोंदा :** येथे पुरवठा विभागाने जप्त केलेल्या स्वस्त धान्य दुकानातील गहू-तांदळाच्या लिलाव प्रक्रियेवरून आरोप-प्रत्यारोप करण्यात आले आहेत. काहींनी पुरवठा विभागाच्या लिलाव प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत, तर लिलाव घेणाऱ्याने आपणास खंडणी मागितली, याबाबत गुन्हा दाखल केला आहे. आता जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे यांनी लिलाव प्रक्रिया कशी राबविली, याचा अहवाल श्रीगोंदा तहसीलदार यांच्याकडून मागवला आहे.

# आईच्या डोळ्यासमोर मुलाला बिबट्याने उचलून नेले!

## ■ सात वर्षांच्या मुलाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू ■ शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा येथील घटना

**शिरुर : प्रतिनिधी**

**रात्रीच्या वेळी आईच्या मागे मागे येणाऱ्या एका ७ वर्षीय चिमुकल्याला बिबट्याने झडप मारुन आईच्या डोळ्यासमोरुन उचलून नेले. मांडवगण फराटा येथे ही थरारक घटना घडली. या हल्ल्यात चिमुकल्याचा मृत्यु झाला आहे. वन्स राजकुमार सिंग (वय ७ वर्षे) असे मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव आहे. तर झालेल्या घटनेने मांडवगण परिसरात घबराट पसरली असून संपूर्ण परिसर सुन्न झाला आहे.**

याबाबत सविस्तर अशी की, मांडवगण फराटा येथील दगडवाडी रोड, गोकुळनगर येथे संदीप अशोक घाडगे यांचे उसाचे गुऱ्हाळ आहे. या गुऱ्हाळवर राजकुमार नथू सिंग हे कुटुंबासमवेत कामाला आहेत. राजकुमार सिंग व त्यांची पत्नी रेखा यांच्यात शुक्रवारी घरी असतानाच घरगुती कारणावरून किरकोळ वाद सुरू होता.



रात्रीच्या वेळी आई पुढे चालत असताना मागून त्यांचा वन्स हा मुलगा येत होता. आईने मागे येणाऱ्या मुलाचा जोराचा रडण्याचा आवाज पाहिला असता त्यावेळी तिला बिबट्याच्या जबड्यात स्वतः चा चिमुकला दिसून आला. या दृष्याने आईचा थरकाप उडाला. या वेळी बिबट्याने आईच्या डोळ्यासमोरच चिमुकल्यावर हल्ला करत उसाच्या शेतात फरफटत नेले. त्यानंतर आईने मोठ्याने आरडाओरडा केला. यावेळी उपस्थित असणाऱ्या गुऱ्हाळ कामगार, उसतोड कामगार व उपस्थित असणाऱ्यांनी शोध घेण्याचा प्रयत्न सुरु केला. दरम्यान पोलिस व वनविभागाला ही माहिती कळविण्यात आली. त्यानंतर रात्री उशिरा चिमुकल्याला गंभीर जखमी अवस्थेत शोधण्यात यश आले. तेथून दवाखान्यात उपचारांसाठी नेण्यात आले मात्र उपचारापूर्वीच मुलाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.दरम्यान, मांडवगण फराटा परिसरात उसाचे क्षेत्र मोठे आहे. अनेक ठिकाणी उसाची तोड सुरू आहे. सातत्याने बिबट्या हा नागरिकांना निदर्शनास येतो मात्र त्यावर ठोस उपाययोजना केल्या जात नाही. अनेक नागरिक झालेल्या प्रकाराने भयभीत झाले आहे. याबाबत गुऱ्हाळ चालक संदीप अशोक घाडगे यांनी पोलिसांत खबर दिली आहे.

## काव्यरंग

### खंत खोडाची



आग लागली खोडाला
आच न लागे देठाला,
उगाच का हा वृक्ष वाढवू
चिमटा घेऊन पोटाला!

वंशवृक्ष हा वाढत जाई
अंत ना उरला त्याला काही
तुडुंब भरली गावे, शहरे...
किति लटकती काठाला,
उगाच का वृक्ष वाढवू
चिमटा घेऊन पोटाला!

देवाजीचे दान जरी हे
अपुरे पडले रान परी हे
छप्पर पडले, पदर फाटला...
हसू दाटले चिलटाला,
उगाच का हा वृक्ष वाढवू
चिमटा घेऊन पोटाला!

बरकत इतकी उदंड झाली
तरी ना आमुची घमंड गेली
उत्पात न आता दूर राहीला...
गाडी लागली घाटाला,
उगाच का हा वृक्ष वाढवू
चिमटा घेऊन पोटाला!

साहेबराव ठाणगे..

# लसूण ४०० रुपये पार ; भाज्यांचे भावही कडाडले

## ■ उपनगरात भाजीपाल्यांचा तुटवडा ■ महिला वर्गाचे बजेट कोलमडले

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**मागील महिन्यात व गेल्या आठवड्यात राज्यभर झालेल्या रिमझिम व संततधार पावसामुळे हिरव्या पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या शहरामध्ये गावरान लसूण प्रतिकिलो ४०० रुपये दराने विकला जात आहे. १५ दिवसांपूर्वी लसूण २०० रुपये किलो होता.**

नगर कृषी उत्पन्न बाजार समिती, नालेगाव परिसरातील भाजीबाजार, चितळे रोडवरील बाजार, सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, एकविरा चौकाजवळील भाजीबाजार, गणेश चौक परिसर, बालिकाश्रम रोड परिसर आदी ठिकाणी फेरफटका मारुन बाजारभाव जाणून घेतले असता, भाजीपाल्याची आवक कमी झाल्याचे समोर आले आहे. आवक



मंदावल्यामुळे बाजारात मेथी, कारले, गवार, भेंडी, दोडके, गिलके आदींच्या भावात वाढ झाल्याचे दिसून आले. कारल्याचा दर मागील १५ दिवसांच्या तुलनेत १० रुपयांनी कमी झाला आहे. शेवगा तब्बल १८० रुपये किलो दराने मिळत आहे. मेथी व कोथिंबीर जुडी ४० रुपयांना आहे.

गणेशोत्सवात फुले, विड्याची पाने, केळीची पाने, दूर्वा यांना मागणी वाढली होती. नवरात्रीमध्ये फुले, पानांचे दर वाढलेले होते. केडगावातील भाज्यांचे व्यापारी साईनाथ राऊत म्हणाले, व्यापारी बाजारात भाजीपाल्यांची आवक सरासरीच आहे, परंतु सणासुदीत हिरव्या पालेभाज्यांना मागणी वाढलेली असल्याने बहुतांश भाजीपाल्यांचे दर सध्या वाढले आहेत.

**भाजीपाल्याचे दर (प्रतिकिलो)**


गवार- २००, बटाटा - ४०, पालक - ३०, मेथी जुडी- ४०, कोबी- ३०, फ्लॉवर- ६०, काकडी- ३०, कोथिंबीर जुडी- ४०, कांदा ६०, दोडका ६०, वांगी ६०, कारले ५०, शेवगा १८०, लसूण ४००, लिंब ८०, टोमॅटो ६०.

# मोहटा देवीचा गाभारा गुलाब पुष्पांनी सजला !

## भोसले परिवारातर्फे सजावट । गुरूपौर्णिमेपासून देवीचा मूळ तांदळा दर्शनासाठी खुला

**पाथर्डी : प्रतिनिधी**

**शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता मोहटा देवस्थानात गुरुवारी (१७ ऑक्टोबर) पौर्णिमेच्या दिवशी झाली. देवीचा मूळ स्वरूपातील तांदळा (मूर्ती) या दिवसापासून दर्शनासाठी भाविकांना खुली होते. अहिल्यानगरच्या भाविकाला देवीने दिलेल्या स्वप्न दृष्टांताप्रमाणे यंदा प्रथमच संपूर्ण गाभाऱ्याची गुलाबपुष्पांनी केलेली सजावट भाविकांचे आकर्षण ठरले.**



अहिल्यानगरचे भाविक उमेश भोसले यांनी सांगितल्यानुसार, ते अनेक वर्षांपासून मोहटादेवी दर्शनासाठी येतात. नवरात्रीतही दर्शनाची वारी असते. मागील वर्षी दर्शन घेताना त्यांच्या मनात गाभारा सजवून सुशोभित करण्याचा विचार आला. काळाच्या ओघात त्यांना विसर पडला. नवरात्रीपूर्वी दोन दिवस पहाटे त्यांना स्वप्नात देवीचा सजवलेला गाभारा दिसला. त्यांनी सकाळी तेथील सेवक अंकुश ठोंबरे यांना फोन करत विचारणा केली. नवरात्रीत सर्व दिवस सजावट करणारे भाविक निश्चित झाले असून, तुम्ही पौर्णिमेला सजावट करू शकता, असे त्यांनी सांगितले.

भोसले परिवार व मित्रांनी कारागिराला भव्य असा संपूर्ण गाभारा देवीला प्रिय असणाऱ्या गुलाब पुष्पांनी सजवण्यास सांगितले. सुमारे १५ तासांच्या परिश्रमानंतर सजावट कार्य पूर्ण झाले. उपस्थित हजारो भाविकांनी अत्यंत सुंदर सजावट केली. त्यामुळे देवीचे खुललेले रूप पाहून उत्स्फूर्तपणे देवीचा जयजयकार केला. विशेष म्हणजे, स्वप्न दृष्टांतात जसा व ज्या रंगांच्या गुलाबपुष्पांची सजावट बघितली, तोच देखावा त्याच रंगसंगतीसह डोळ्यापुढे पाहून भोसले यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. याबाबत उमेश भोसले यांच्याशी चर्चा केली असता, देवीचे खूप जागृत स्थान असून स्वप्नदृष्टांताप्रमाणे गाभारा सजावटीचे भाग्य आपल्याला मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे व सेवेकरी अंकुश ठोंबरे यांच्या विशेष सहकार्यामुळे लाभल्याचे त्यांनी सांगितले.

प्रत्येक भाविकाला देवीची मूळ मूर्ती पाहण्याची व तिचे दर्शन घेण्याची तीव्र ओढ असते. स्वयंभू अवस्थेतील देवीचा लाल भडक, बोलका व अत्यंत देखणा पुतळा पाहताना सजीव वाटतो. नवरात्रौत्सवात त्यावर सोन्याचा मुखवटा बसवला जातो. पौर्णिमेला पुन्हा मूळ रूपात देवीचे दर्शन होते. यंदा गुलाब पुष्पांची सजावट असल्याने यापूर्वी कधीही न पाहिलेला सुंदर असा गाभारा डोळ्याचे पारणे फेडणारा ठरला.

# सोयाबीनच्या २३ गोण्या चोरणारे जेरबंद

## सापळा रचून पोलिसांनी घेतले ताब्यात

**साकत : प्रतिनिधी**

**येथील शेतकऱ्यांच्या २३ सोयाबीनच्या गोण्या चोरणाऱ्या दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. पथकाने त्यांच्याकडून चोरलेल्या १९ सोयाबीनच्या गोण्या हस्तगत केल्या आहेत. अनानाथ गजानन काळे (वय २२) व देवकर गजानन काळे (वय २०, दोघे रा. दहिगाव, ता. अहिल्यानगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत. त्यांचे सहा साथीदार पसार आहेत.**



साकत (ता. अहिल्यानगर) येथील सतीश कार्ले यांच्या जनावरांच्या गोठ्यातील सोयाबीन भरलेल्या २३ गोण्या चोरांनी १० ऑक्टोबरला लंपास केल्या होत्या. या प्रकरणी सतीश कार्ले यांनी अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानुसार पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून घेतला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपवला होता.


पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. पथकाला माहिती मिळाली की, दहिगाव येथील अनानाथ काळे व त्याच्या साथीदारांनी हा गुन्हा केला आहे. आरोपी हे दहिगाव ते वाळकी रस्त्याने जात आहेत. त्यानुसार पथकाने सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. चोरला गेलेल्या २३ गोण्यांपैकी १० गोण्या वाळकीतील एका दुकानातून तर ९ गोण्या रुईछत्तीसी येथील एका दुकानातून असा ४६ हजार २२५ रुपयांचा मद्देमाल पथकाने हस्तगत केला. पथकाने पुढील तपासासाठी जेरबंद दोन्ही आरोपींना अहिल्यानगर तालुका पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# भाजपा उमेदवारांची यादी जाहीर होताच पहिली बंडखोरी?

## श्रीगोंद्यात सुवर्णा पाचपुतेंचा निर्धार ''पक्षाला ताकद दाखवणार''

**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीच्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर राज्यातील वेगवेगळ्या मतदारसंघांमध्ये नाराजीनाट्य पाहायला मिळू लागलं आहे. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यामधील श्रीगोंदा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी म्हणून भाजपा नेत्या तथा भाजपा महिला आघाडीच्या आहिल्यानगर जिल्हा सरचिटणीस सुवर्णा पाचपुते इच्छुक होत्या. त्यांनी मतदारसंघात मोर्चेबांधणी देखील केली होती. मात्र, पक्षाने त्यांच्याऐवजी प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे सुवर्णा पाचपुते यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. प्रसारमाध्यमांसमोर बोलताना त्यांना हुंदका आवरता आला नाही. तसेच त्यांनी भाजपावर टीका केली आहे. यासह सुवर्णा पाचपुते यांनी पक्षाला ताकद दाखवून देईन असा इशारा देखील दिला आहे.**



सुवर्णा पाचपुते म्हणाल्या, ''मला लोकांचा मोठा आधार मिळाला आहे. आज माझ्या डोळ्यात पाणी आलंय, पण ते खाली गळत नाही. कारण माझ्यामागे मोठा जनसमुदाय उभा आहे. लोकांचा मला पाठिंबा आहे. माझे लोक मला सांगतायत, ताई तुम्ही काहीही करा, परंतु, निवडणुकीला उभ्या राहा. त्यामुळे मी एक गोष्ट करणार आहे. माझी आणि पक्षाची विचारधारा सारखी आहे. त्यामुळे मी निवडणूक लढले तर अपक्ष लढेन. मी इतर कोणत्याही पक्षात जाणार नाही. मला केवळ माझ्या पक्षाला स्वतःची ताकद दाखवून द्यायची आहे. कारण माझा पक्ष धृतराष्ट्रासारखा झाला आहे. त्यांना असं वाटतंय की महाभारत व्हायचं ते होऊ द्या, जनतेचं जे काही व्हायचं असेल ते होऊ द्या. आम्हाला केवळ आमची सत्ता आणायची आहे. जवळपास प्रत्येक पक्षाचं होच ध्येयधोरण आहे.

**भाजपाकडून ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर**

विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाने रविवारी (२० ऑक्टोबर) उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत भाजपाने ९९ जागांवरील उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपाने देवेंद्र फडणवीस यांना नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघातून पुन्हा एकदा उमेदवारी दिली आहे. तर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.आशिष शेलारयांना वांद्रे पश्चिम, अतुल भातखळकर यांना कांदिवली पूर्व, राम कदम यांना घाटकोपर पश्चिम, मीहिर कोटेचा यांना मुलुंड, गणेश नाईक यांना ऐरोली, रवींद्र चव्हाण यांना डोंबिवली,चंद्रकांत पाटीलयांना कोथरूड, तर, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना कुलाबा मतदारसंघातून संधी देण्यात आली आहे.

(पान १ वरून)

## खबरदार! माझ्या बापाविषयी बोलाल तर!

माझ्या भावांना त्रास द्यायचा नाही. हे बाळासाहेब थोरात यांची सुपुत्री आणि भाऊसाहेब थोरात यांची नात बोलतीये. आपल्याकडे फक्त ३० दिवस, साहेबांची कॉलर टाईट होईल असे काम करायचे आहे. आपल्याला बाळासाहेब थोरात यांना मुख्यमंत्री पदावर बसवायचेच आहे, असं जयश्री थोरात म्हणाल्या होत्या.

**सुजय विखे पाटील काय म्हणाले?**

दोन दिवसांपूर्वी सुजय विखे पाटील यांची संगमनेर येथे सभा पार पडली. यावेळी ते म्हणाले, आजची सभा संगमनेर विधानसभेच्या परिवर्तनाची नांदी आहे. चाळीस वर्षांची दहशत मोडून काढणारी आजची सभा आहे. चाळीस वर्षात तुम्हाला महिलेच्या डोक्यावरचा हंडा काढता येत नसेल तर तुम्हाला विधानसभेचा फॉर्म भरायचा सुद्धा अधिकार नाही.

मला तिकीट नाकारलं हे मीडियात पाहिलं, कोणत्या सूत्रांनी ही माहिती दिली? यांची हवा इतकी टाईट झाली का आता हे बातम्या सुद्धा पेरायला लागले. चाळीस वर्षे तुम्ही सेटलमेंटच राजकारण केलं. मात्र आता असा गडी आलाय, की जो तुमचे ऐकणार नाही.
महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांचे आता आमदार होणं सुद्धा अवघड झाल आहे. मुख्यमंत्री सोडा, यांच्या नावापुढे आमदार तरी राहतं का? अशी परिस्थिती आहे. लोकसभेला दुर्दैवाने माझा पराभव झाला. यांना आणि यांच्या कार्यकर्त्यांना लय आनंद झाला. आरे हटा... माझा पराभव तुम्ही करू शकत नाही. लोकसभा निवडणूक धर्म आणि जातीच्या नावावर झाली म्हणून सुजय विखे पडला. विकास कामाच्या आधारावर निवडणूक झाली तर महाराष्ट्रात कुणामध्ये दम नाही सुजय विखेला पाडायचा.
संगमनेरमध्ये माझ्या कार्यकर्त्यांवर जर कोणी दहशत करायचा प्रयत्न केला, जर माझ्या एकाही कार्यकर्त्याला हात लावायचा प्रयत्न केला तर इथेच येऊनच मी तुम्हाला गाडेल हा सुजय विखेचा शब्द आहे, असा इशारा सुजय विखे यांनी दिला होता.

## पारनेरच्या जागेसाठी शिवसेनेचा शिंदे गट अजूनही आशावादी!

जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे हे धनुष्यबाणावर लढण्यास तयार होते. मात्र त्यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याने आता उमेदवार कोण हा प्रश्न असला तरी शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांकडे सक्षम उमेदवार असल्याचा दावा एका पदाधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या शब्दावर केला.
महायुतीकडून ही जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. अजित पवार यांनी शनिवारी पारनेरमध्ये येऊन मेळावाही घेतला आहे. अजित पवार गटाकडून पाच ते सहा इच्छुक उमेदवार असले तरी पवार यांनी एक नाव निश्चित केल्याचीही माहीती आहे. या पार्श्वभुमीवर शिंदे गट अजूनही पारनेरच्या जागेसाठी प्रयत्नशिल असल्याने महायुतीचा नेमका निर्णय काय याची उत्सुकता आहे.

# तरूणाचा मृत्यू, वडगांव सावताळमध्ये दारूबंदी !

■ महिलांसह ग्रामस्थांनी उध्वस्त केले दारू अड्डे ■ दारूबंदी समितीची स्थापना



**वडगांव सावताळ : प्रतिनिधी**

**अतिमद्यपानामुळे १८ वर्षीय तरूणाचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभुमीवर वडगांव सावताळ येथील दारूबंदीचा निर्णय घेण्यात येऊन महिलांसह ग्रामस्थांकडून दारू अड्डे उध्वस्त करण्यात आले. दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दारूबंदी कृती समितीची स्थापना करण्यात आली असून दारूबंदीच्या निर्णयाची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सरपंच संजय रोकडे यांनी सांगितले.**

दारूबंदीबाबत वडगांव सावताळ ग्रामस्थांनी अनेकदा ठराव केले, मात्र पोलीसांकडून दारू विक्रेत्यांना अभय देण्यात आल्याने अवैध दारू विक्री जोमाने सुरू होती. विशेषतः तरूणांमध्ये दारू अडडयांमुळे व्यसनधिनता वाढीस लागली होती. त्यातूनच तरूणाचा मृत्यू झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त करीत दारू अड्डे उध्वस्त करीत यापुढील काळात गावामध्ये दारूची विक्री होणार नाही असा निर्धार केला.

सरपंच संजय रोकडे, सेवा संस्थेचे मा. अध्यक्ष कर्ण रोकडे, माजी सरपंच राजेंद्र रोकडे, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम रोकडे, सतिश तिखोळे, रामा गांगुर्डे राजू भोसले, दत्तात्रय सरोदे, सतीश गायकवाड, पप्पू खोसे, खंडू व्यवहारे, प्रमोद गायकवाड, रवी शिंदे, संपत बर्डे, सोपान पवार, सुरेश पवार, अजय साळवे, बाबा भोंबाळ, राजू क्षिरसागर यांनी दारूबंदीसाठी पुढाकार घेतला.

ग्रामस्थांनी दारूबंदीचा निर्णय घेतल्यानंतर टाकळी ढोकेश्वर दुरक्षेत्राचे पोलीस कर्मचारी वडगाव सावताळ येथे दाखल झाले. त्यांनी १० हजार रूपयांच्या दारूचा साठा जप्त करीत हॉटेल चालकांवर गुन्हे दाखल केले.

### दारूबंदी समितीची स्थापना

**रविवारी ग्रामस्थांनी सरपंच संजय राकडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन दारूबंदी समितीची स्थापना केली. राजेंद्र दिगंबर भोसले अध्यक्ष, गौतम बन्सी रोकडे उपाध्यक्ष, रवी भाऊसाहेब शिंदे उपाध्यक्ष यांची यावेळी निवड करण्यात आली. दारूबंदीचा निर्णय घेतल्याबद्दल दीपक लंके यांनी सरपंच संजय रोकडे यांचा सत्कार केला.**

# आणि लाडक्या बहिंणीसाठी अजितदादांनी थांबविली गाडी !

## राख्या बांधत बहिणींकडून दादांचे स्वागत

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर येथील मेळाव्यासाठी जात असताना अजितदादा पवार यांनी त्यांची वाट पाहत असलेल्या बहिणींसाठी आपली गाडी थांबवत त्यांच्याशी संवाद साधला. बहिणींनी त्यांना राख्या बांधून स्वागत केले.**

पवार यांची सभा शनिवारी दुपारी दोन वाजता पारनेर येथील बाजारतळावर होती. पवार हे नाशिक येथील सभा आटोपून हेलिकॉप्टरने पारनेर येथे पोहचणार होते. खराब हवामानामुळे नाशिक येथून हेलीकॉप्टरचे उड्डाण लांबले आणि पवार यांना पारनेरात पोहचण्यासाठी दोन तास विलंब झाला.

सभेसाठी उशिर झाल्यानंतर पवार यांनी सभेपूर्वीचे इतर कार्यक्रम रद्द करून थेट सभा स्थळी जाण्याचा निर्णय घेतला. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार पवार हे हेलीकॉप्टरमधून उतरल्यानंतर शिवाजी चेडे यांच्या बंगल्यावर जाऊन अल्पोपहार घेणार होते. दादा यांच्या स्वागताची चेडे परिवाराकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. चेडे यांच्या निवासस्थानी जाण्याचेही पवार यांनी टाळले होते, मात्र जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी रेखा चेडे, प्रमिला चेडे तसेच रेखा गाडेकर यांनी त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी केल्याचे सांगितल्यानंतर पवार यांनी भगिनींची भेट घेण्याचे मान्य केले.

चेडे यांच्या बंगल्यासमोर गाडी थांबविण्याची सुचना करून पवार यांनी रेखा चेडे, प्रमिला चेडे, रेखा गाडेकर यांच्या स्वागताचा स्विकार केला. तिघाही भगिनींनी अजितदादा यांना राख्या बांधल्यानंतर दादांनी त्यांना ओवाळणीही दिली. सभा आटोपून वेळेत मुंबई पोहचण्याची घाई असूनही पवार यांनी गाडी थांबवून स्वागताचा स्विकार केल्याबद्दल रेखा चेडे, प्रमिला चेडे, रेखा गाडेकर यांनी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी शिवाजी चेडे, अशोक चेडे, प्रशांत गायकवाड हे उपस्थित होते.



■ पारनेर येथे मेळाव्यासाठी आलेल्या अजित पवार यांचे चेडे परिवाराकडून राख्या बांधून स्वागत करण्यात आले.

# कुस्ती स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूलचा ओम खर्से राज्यात तृतीय

## ७५ किलो वजन गटात ब्रांझ पदकाची कमाई



**पारनेर : प्रतिनिधी**

**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स पारनेर विद्यालयातील पै. ओम धनंजय खर्से याने शालेय कुस्ती स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक पटकावला अशी माहिती विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख बापूराव होळकर यांनी दिली.**

नुकत्याच दि.१९ व २० ऑक्टोबर रोजी शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा परभणी येथे संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये विद्यालयातील पै. ओम धनंजय खर्से याला ७५ किलो वजन गटात ब्रांझ पदक मिळाले व विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला ओम हा पैलवान धनंजय खर्से यांचा मुलगा आहे तो पारनेर येथील शिवछत्रपती कुस्ती संकुल पारनेर येथे नगरसेवक पैलवान युवराज पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे धडे गिरवत आहे.

त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद दरे,सचिव अँड. विश्वासराव आठरे पाटील, माजी अध्यक्ष मा.आमदार नंदकुमार झावरे,जेष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी ,मॅनेजिंग कौन्सलिंग सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी संस्थेचे सर्व पदाधिकारी विद्यालयाचे प्राचार्य अर्जून भुजबळ, मनिषा गाडगे , प्रा . सतिष फापाळे अजित दिवटे , जयवंत पुजारी व विद्यालयातील सर्व सेवक वृंद यांनी अभिनंदन केले. जिल्ह्यातील कुस्ती शौकीन कुस्तीगीर परिषदेचे सचिव प्रा . डॉ. संतोष भुजबळ,प्रा. निलेश मदने , पै . प्रमोद गोडसे , मेजर शंकर खोसे ,पै .शैलेश रोहोकले कुस्ती पंच पै .विवेक नायकल वडील धनंजय खर्से यांनी कौतूक केले.ओमला विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख बापूराव होळकर व कुस्ती कोच चंदन शर्मा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. परभणीच्या क्रीडा अधिकारी कविता नवांदे यांच्या हस्ते ओम खर्से याचा सत्कार करण्यात आला.

# गुंतवणूक व उद्योगासाठी मार्गदर्शनाची गरज

## खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**गुंतवणूक व उद्योग व्यवसाय यामध्ये प्रामुख्याने मार्गदर्शन होण्याची गरज असून यासाठी सुजित लंके यांचे फाईनलीट मार्गदर्शन केंद्र सर्वोत्तम ठरणार असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केले आहे.**

फाईनलिट गुंतवणूक व मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन खासदार लंके यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. यावेळी बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद सर, माजी सरपंच ठकारामशेठ लंके, निघोज परिसर कृषी फलोद्यान सहकारी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत लामखडे, निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शिवाजीराव लंके, बाजार समितीचे माजी उपसभापती बबुशा वरखडे, कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सोमनाथ वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त रोहिदास लामखडे, पतसंस्थेचे संचालक भिवाशेठ रसाळ, बाळासाहेब लामखडे, बाजार समितीचे माजी संचालक आण्णापाटील बढे, माऊली तनपुरे, बबनराव तनपुरे, विघ्नहर्ता सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सुभाष साठे, तुकाराम कवडे, भागुजी गुंड, श्री.पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष दत्तात्रय गुंड, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, बालाजी दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष अरुणशेठ लंके, साई दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा मंगेश लंके, नंदलाल दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष दत्तात्रय भुकन, मुंबई येथील व्यवसायीक भिवाजी गुंड , माजी उपसरपंच बाबाजी लंके, श्री पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे मॅनेजर संतोष बनकर आदी तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार लंके यांनी फाईनलिट गुंतवणूक व मार्गदर्शन केंद्राचे कौतुक करताना त्यांनी चेअरमन चंद्रकांत लंके, बबन लंके सर, पियुष लंके, सुजित लंके यांचे कौतुक केले. समाजाभिमुख काम करताना लंके कुटुंबाने शेती व सहकार क्षेत्रात काम करताना धार्मिक सामाजिक क्षेत्रात काम करीत समाजासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. सुजित चंद्रकांत लंके हे उच्च शिक्षीत आहेत फाईनलिट गुंतवणूक व मार्गदर्शन केंद्राचे काम सुरू करताना त्यांनी मोठा अनुभव घेतला असून याचा फायदा जनतेला मोठ्या प्रमाणात मिळणार असून या भागात शेतीमुळे आर्थिक समृद्धी आली आहे. या भागातील व्यवसाय व गुंतवणूक कशाप्रकारे झाली पाहिजे याचे मार्गदर्शन सुजित लंके यांच्याकडून होणार असून निघोज व परिसरातील युवकांनी या मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन खासदार लंके यांनी केले आहे.

प्रास्ताविक भाषणात फाईनलिट संदर्भात माहिती देत सुजित लंके यांनी बँका व त्यांचे आर्थिक धोरण या विषयी माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पियुष लंके यांनी केले. शेवटी श्री. पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन चंद्रकांत लंके व बबन लंके सर यांनी आभार मानले.

# पारनेरच्या विद्यार्थ्यांनी बनवले पर्यावरणपूरक आकाश कंदील

## प्लास्टिकचा वापर टाळत स्वनिर्मितीचा आनंद | नैसर्गिक घटकांचा वापर करा : प्रा.भुजबळ

**पारनेर : प्रतिनिधी**

**दिवाळी सणात कंदिलाला महत्त्व आहे. घराची शोभा वाढते ती गॅलरीत किंवा वऱ्हांड्यात लावण्यात आलेल्या कंदिलामुळे. पर्यावरणपूरक आकाश कंदील बनवा कार्यशाळा येथील न्यू.इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आली. यात इ ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सुंदर, सुबक इको फ्रेंडली आकाश कंदील बनवले. विद्यार्थ्यांनी स्वनिर्मितीचा आनंद काय असतो याच अनुभव यावेळी घेतला.**



येथील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स विद्यालय एक उपक्रमशील विद्यालय आहे . या विद्यालयात पर्यावरण पूरक आकाश कंदील व पणती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.उपक्रमशील कलाशिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांच्या संकल्पनेतून या उपक्रमाचे संयोजन करण्यात आले होते. इयत्ता पाचवी ते इयत्ता आठवीच्या २६५ विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागदापासून आकर्षक आकाश कंदील व पर्यावरणपूरक शाडू माती पासून विविध आकाराच्या सुंदर आकर्षक पणत्या तयार केल्या.

सण-उत्सव,समारंभ साजरे करताना पर्यावरण संरक्षणाचे भान विद्यार्थ्यांच्या मनात रुजावे ,विद्यार्थ्यांच्या कृती कौशल्याला वाव मिळावा व विद्यार्थ्यांनी नवनिर्मितीचा आनंद घ्यावा हा या कार्यशाळेचा उद्देश असल्याचे कलाशिक्षक ज्ञानेश्वर कवडे यांनी सांगितले तर कवडे सर यांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे पर्यावरण पूरक आकाश कंदील व शाडू माती पासून पणत्या आम्ही तयार केल्या या कार्यशाळेत आम्हाला खूप आनंद मिळाला.आम्ही स्वतः बनविलेल्या आकाशकंदील व पणतीद्वारे आम्ही आमच्या घरचा दिवाळी सण साजरा करणार आहोत असे विद्यार्थीनी गायत्री अंबुले हिने सांगितले. दिवाळी सण जवळ आलेला आहे दिवाळी हा दिव्यांचा सण म्हणून संपूर्ण भारतात साजरा केला जातो अलीकडे घरोघरी प्लास्टिकचे आकाशकंदील विकत आणले जातात व तसेच पणती सुद्धा कृत्रिम घटकांपासून बनवलेल्या असतात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो .प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे आणि त्या माध्यमातून पर्यावरणाचे संरक्षण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे .या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक जनजागृती होण्यास निश्चित मदत होईल प्लास्टिक टाळा आणि पर्यावरण वाचवा हा संदेश या निमित्ताने समाजापर्यंत जाईल नैसर्गिक घटकांद्वारे आपले सण उत्सव साजरे करावेत असे आवाहन प्राचार्य अर्जुन भुजबळ यांनी विद्यार्थ्यांना केले . यावेळी उच्च माध्यमिक विद्यालयाचे समन्वयक प्रा.अजित दिवटे प्रा.सतिष फापाळे जेष्ठ शिक्षिका श्रीमती मनिषा गाडगे श्रीमती मनिषा जगदाळे,जयवंत पुजारी, बापूराव होळकर उपस्थित होते .कार्यशाळा यशस्वितेसाठी विद्यालयातील शिक्षक सुशांत पंदरकर , श्रीकांत शिंदे , श्रीमती मंगल पठारे , श्रीमती वैशाली सालके , श्रीमती सुरेखा थोरात सुरज घोडके ,रविंद्र काळे यांनी सहकार्य केले .

# अमेरिकेतील स्पर्धेत कायरा मगरची उल्लेखनीय कामगिरी

## १४ मिनिटे १२ सेकंदात पार केले साडेतीन किलोमीटरचे अंतर

**पारनेर : प्रतिनिधी**

**अमेरिकेतील जॉर्जटाऊन केंटकी येथे नुकतीच पार पडलेली क्रॉस कंट्री (धावण्याची) स्पर्धा सहा वर्षे वयाच्या कायरा भूषण मगरने विक्रमी वेळेत पूर्ण करून बालगटात उल्लेखनीय कामगिरी केली.पहिल्याच प्रयत्नात स्पर्धा पूर्ण करणारी कायरा सहभागी स्पर्धकांमधील सर्वात कमी वयाची स्पर्धक ठरली.साडेतीन किलोमीटरचे अंतर कायराने १४ मिनिटे १२ सेकंद या विक्रमी वेळेत पूर्ण केले.वय वर्षे ६ ते ९ या वयोगटातील एकूण १५० स्पर्धक स्पर्धेत सहभागी झाले होते.**

स्पर्धेविषयी माहिती देताना कायराचे वडील भूषण मगर व आई पल्लवी मगर यांनी सांगितले की,सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये आरोग्य विषयक जागृती निर्माण व्हावी, शारिरीक व्यायामातील धावण्याचे महत्त्व अधोरेखित व्हावे यासाठी स्कॉट काउंटी जॉर्जटाऊन केंटकी ऑर्गनायझेशनच्या वतीने दरवर्षी क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. ऑर्गनायझेशनच्या वतीने सहभागी स्पर्धकांना, स्पर्धेपूर्वी मोफत प्रशिक्षण दिले जाते.

कमालीचे विषम हवामान असलेल्या अमेरिक्यासारख्या देशाच्या बहुतेक भागात वर्षातील सहा ते सात महिने एक तर बर्फवृष्टी सुरू असते किंवा कडाक्याची थंडी असते त्यामुळे मैदानी खेळांसाठी अवघे पाच महिने उपलब्ध असतात.या पाच महिन्यांत आबालवृद्धांनी घराबाहेर पडून शक्य तेव्हढा वेळ मैदानांवर घालावावा,आरोग्यदायी जीवनशैलीसाठी मैदानी खेळांमधून शारिरीक उर्जा कमवावी या हेतूने स्कॉट काउंटी जॉर्जटाऊन केंटकी ऑर्गनायझेशनच्या वतीने क्रॉस कंट्री स्पर्धेचे आयोजन केले जात असल्याचे भूषण व पल्लवी मगर यांनी सांगितले. विशेषतः लहान मुलांमधील मैदानी खेळांची आवड कमी होत आहे.इंटरनेटच्या अतिवापरामुळे लहान मुले विविध अभासी खेळांमध्ये तसेच टीव्हीच्या चक्रात गुरफटून गेले आहेत.घराबाहेर पडून मैदानावर खेळायला जाण्याची मुलांची तयारी नसते.क्रॉस कंट्री सारख्या विविध मैदानी खेळांच्या स्पर्धांमुळे मुलांमध्ये मैदानी खेळांची आवड निर्माण होत आहे ही पालकांच्या दृष्टीने समाधानाची बाब असल्याचे भूषण व पल्लवी मगर यांनी सांगितले.



■ स्कॉट काउंटी जॉर्जटाऊन केंटकी ऑर्गनायझेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या क्रॉस कंट्री स्पर्धेत कायरा मगरने उल्लेखनीय कामगिरी केली.

### कायरा संजय वाघमारे यांची नात

**कायरा ही पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे, पत्रकार विजय वाघमारे तसेच सुनील वाघमारे व विद्या दगडे यांची नात आहे.**

### Running is good for better health

Hello friends,
My teachers Mommy,Dad always told me that running is good for better health. So I participated in cross country competition.I was enjoying running with other kids. My training was good. I had fun and I did it.

KYRA.

# विद्यार्थ्यांनी तयार केले रंगीबेरंगी आकाश कंदील

## मुलिकादेवी विद्यालयात पर्यावरणपूरक कार्यशाळा संपन्न | २०० विद्यार्थ्यांचा सहभाग



**निघोज : प्रतिनिधी**

**बालकांच्या कल्पकतेला वाव मिळावा.विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच इतर उपक्रमांची आवड निर्माण व्हावी.विद्यार्थी स्वावलंबी व्हावेत.स्वतःच्या हाताने एखादी वस्तू तयार करण्याची मजा काही वेगळीच असते.या उद्देशाने यंदाच्या दिवाळीत स्वतःच्या हाताने तयार केलेले पर्यावरण पूरक आकाशकंदील बनविण्यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक मंडळाच्या श्री मुलिकादेवी विद्यालयात कार्यशाळा आयोजित करण्यात आली.**

विद्यालयातील कला शिक्षक संपत रसाळ यांनी सोप्या पद्धतीने कंदील तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविधरंगी,आकर्षक कागदांचा वापर करून आकाश कंदील बनवले.यावेळी शाळेचे कलाशिक्षक संपत रसाळ,प्रभारी मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास होईल. विद्यार्थ्यांमध्ये कलेविषयी आवड निर्माण होईल असे पालक आशा वराळ यांनी सांगितले. तर कार्यशाळेमुळे आकाश कंदील बनविण्याचा अनुभव मिळाला. पुढच्या वर्षी आणखी नाविन्यता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रणिती रसाळ या विद्यार्थिनीनीने सांगितले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com